शनिवार, दि. २ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३५७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

नवसंजीवनी हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मराठा आरक्षणासह शैक्षणिक प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** मराठा समाजाच्या एसईबीसी (सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग) आरक्षणासह शैक्षणिक आणि आर्थिक प्रश्न प्रभावीपणे सोडवण्यासाठी राज्य सरकारने तातडीने मंत्रिमंडळ उपसमिती नेमावी, अशी मागणी मराठा महासंघाने आमदार अर्जुनराव खोतकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. हे निवेदन १ ऑगस्ट रोजी देण्यात आले.

यावेळी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, कोषाध्यक्ष अशोक पडूळ, उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, तसेच इंजी. शुभम टेकाळे, मंगेश मोरे, श्रीधर पोथरे, बाबा राऊत, विशाल कोरडे आणि आकाश जगताप उपस्थित होते. शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले हे देखील या प्रसंगी हजर होते.


**प्रमुख मागण्या आणि निवेदनातील मुद्दे:**

मंत्रिमंडळ उपसमितीची आवश्यकता: डएइउ आरक्षण अधिनियम २०२४ संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी सुरू असली तरी, राज्य शासनाने अद्याप मंत्रिमंडळ उपसमिती नेमली नाही, ही खेदजनक बाब असल्याचे निवेदनात म्हटले आहे. यामुळे न्यायालयीन बाबींमध्ये आणि संबंधित समस्यांमध्ये शासकीय यंत्रणेचा समन्वय साधण्यास अडथळे येत आहेत.

माहिती संकलन आणि अहवालाची गरज: आरक्षणासंदर्भातील डेटा संकलन, माहिती आणि अहवालासाठी समर्पक यंत्रणा कार्यरत असणे आवश्यक आहे.

पूर्वीच्या सरकारच्या धोरणांचा संदर्भ: पूर्वीच्या सरकारने अशा उपसमितीची नेमणूक केली होती, परंतु सध्याच्या सरकारकडून या संदर्भात कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. केवळ सामान्य प्रशासन विभागातील एक अधिकारी उच्च न्यायालयात हजर राहत असून, इतर ठोस प्रतिनिधित्व नाही, अशी खंत व्यक्त करण्यात आली. शैक्षणिक आणि शैक्षणिक पान २ वर

## मतभेद विसरून एकत्र या!



## फूट पाडण्याचे षडयंत्र थांबवा




# जालन्याच्या विकासासाठी एकजुटीची हाक

## तर जालना विकासाचे मॉडेल म्हणून राज्यभर ओळखले जाईल

**दीपक शेळके**

**जालना -** जालना शहर हे मराठवाड्यातील एक महत्त्वाचे व्यापारी, धार्मिक आणि राजकीय केंद्र असूनही शहरास अनेक गंभीर समस्या भेडसावत आहेत. हे लक्षात घेता जालना शहराच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक नेत्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. विशेषतः मा. आमदार अर्जुनराव खोतकर आणि माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी आपले जुने राजकीय मतभेद बाजूला ठेवून जनतेच्या हितासाठी एकत्र यावे, अशीच सामान्य जनता आणि कार्यकर्त्यांची ठाम इच्छा आहे. त्यांच्या या एकजुटीमुळे जालन्याच्या राजकीय पटलावर स्थैर्य निर्माण होईल, विकास कामांना गती मिळेल आणि जनता एका मजबूत नेतृत्वाला साथ देईल, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

**जालना शहरातील प्रमुख समस्या आणि त्यावर एकत्र येऊन काम करण्याची गरज:** जालना शहर सध्या अनेक गंभीर समस्यांनी ग्रासले आहे. या समस्यांवर त्वरित लक्ष देऊन उपाययोजना करणे गरजेचे आहे, आणि यासाठी दोन्ही नेत्यांनी एकत्र येऊन काम करणे अपेक्षित आहे:

**वाहतूक कोंडी आणि खराब रस्ते:** शहरात वाढत्या लोकसंख्येमुळे आणि वाहनांमुळे वाहतूक कोंडी ही एक मोठी समस्या बनली आहे, विशेषतः बाजारपेठ आणि मुख्य रस्त्यांवर. अरुंद रस्ते, पदपथांवरील अतिक्रमणे आणि पार्किंगच्या अपुऱ्या सोयी यामुळे ही समस्या अधिक गंभीर होते. काही ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था आणि खड्डे यामुळे नागरिकांना नाहक त्रास होतो.

**सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची कमतरता:** शहरांतर्गत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची कमतरता किंवा ती सुस्थितीत नसणे, यामुळे नागरिकांना रिक्षा आणि खाजगी वाहनांवर अधिक अवलंबून राहावे लागते.

**पाणीटंचाई:** जालना शहराला आजही पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पुरेसा आणि नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने अनेक भागांमध्ये आठवड्यातून एकदा किंवा दोनदाच पाणी येते, ज्यामुळे नागरिकांना पाण्याचा साठा करावा लागतो. जुन्या जलवाहिन्या आणि पाण्याची गळती यामुळेही समस्या वाढत आहे.

**सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापन:** शहरात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची कमतरता किंवा त्यांची अपुरी क्षमता, गटार योजना आणि सांडपाणी निचऱ्याची योग्य व्यवस्था नसणे, यामुळे पावसाळ्यात अनेक ठिकाणी पाणी तुंबते आणि अस्वच्छता वाढते. कचरा संकलन आणि त्याच्या विल्हेवाटीची योग्य व्यवस्था नसणे यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होतात.

**अतिक्रमणे:** पदपथ आणि रस्त्यांवर वाढलेली अतिक्रमणे वाहतूक कोंडी आणि पादचाऱ्यांसाठी अडचण निर्माण करतात, ज्यामुळे शहराच्या सौंदर्यीकरणावरही परिणाम होतो.

आरोग्य सुविधा: शहरातील सरकारी रुग्णालयांवर वाढता ताण, विशेषज्ञ डॉक्टरांची कमतरता आणि आधुनिक उपकरणांची अपुरी उपलब्धता ही देखील एक समस्या आहे.

**पार्किंगची समस्या:** वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे शहरात पार्किंगची मोठी समस्या निर्माण झाली आहे, विशेषतः बाजारपेठ आणि व्यावसायिक क्षेत्रांमध्ये.

उद्याने आणि मोकळ्या जागांची कमतरता: शहराच्या विकासात उद्याने, खेळाची मैदाने आणि मोकळ्या जागांची कमतरता जाणवते, ज्यामुळे नागरिकांना विरंगुळ्याची ठिकाणे कमी मिळतात.

**धुळीची समस्या:** बांधकाम प्रकल्प, खराब रस्ते आणि वाहतूक यामुळे शहरात धुळीचे प्रमाण वाढते, ज्यामुळे श्वसनाचे आजार वाढू शकतात.

**महात्मा फुले मार्केटचा प्रश्न:** या मार्केटचा प्रश्न अद्यापही कायम आहे आणि त्यावर तोडगा काढण्याची आवश्यकता आहे.

**एकजुटीने विकासाला मिळेल बळ:**

एका पक्षाच्या नेत्याकडे मुख्यमंत्री तर दुसऱ्या नेत्याकडे उपमुख्यमंत्री आहेत, ही बाब जालन्याच्या विकासासाठी नक्कीच फायद्याची ठरू शकते. त्यामुळे आमदार अर्जुनराव खोतकर आणि भाजपवासी झालेले माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी एकमेकांवर चिखलफेक न करता शहराच्या विकासासाठी ठोस उपाययोजना आखण्याबाबत विचार करावा, अशी जालन्यातील सामान्य जनतेची अपेक्षा आहे.

**एकत्र येण्याचे फायदे:**

दोन्ही नेत्यांकडे असलेल्या सत्ताधारी पक्षांच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाकडून विशेष निधी मिळवणे शक्य होईल. स्थानिक विकास आराखड्यांना गती मिळेल.

जनतेचा प्रशासनावरचा विश्वास वाढेल.

शहराच्या दैनंदिन समस्यांनी त्रस्त झालेल्या जनतेसाठी हा मुद्दा केवळ राजकीय नसून अत्यंत व्यावहारिक आहे. युट्युबवरील काही तथाकथित बोगस पत्रकारांनी या दोघांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला तरी सामान्य जनतेने नेहमीप्रमाणे विवेकी भूमिका घेतली आहे. समाजहितासाठी एकता हाच खरा मार्ग आहे. हे दोन्ही नेते एकत्र आले, तर जालना विकासाचे मॉडेल म्हणून राज्यभर ओळखले जाईल, यात शंका नाही.

युवा आदर्श


## दगा ...

फेर धरुनि गोल गोल
खेळत बसलो हादगा
कळले नाही गनिमाने
केंव्हा कधी दिला दगा
गडबड निवडणूकीची
नाजूक बनवला धागा
जातिवंत घोडे तिकडे
रिकामा इकडचापागा
तिकडे जो राही उभा
इकडे उभा त्यांचासगा
बाप इथे मैदानी हवा
तिथे जर उभा मुलगा
अंडी देणारी मुर्गी प्रिय
कापला जाणारं मुर्गा
मॉनीटर म्हणून आला
शिकवतो अख्या वर्गा
जिंकायले हवे नक्की
फायदा आपला बघा
माळी असता चाणाक्ष
माळरानी फुलवे बागा
खुशाल ठोकावे बोंबा
जवळ आहे शिमगा
निर्णय घ्यावा वेळेवरी
वेळेची किंमत उमगा
जिंकेल त्याला मिळेलं
निवडावी हुकमीजागा
मतदार कानोसा घेता
रे संयमित सतर्क वागा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जालन्यात रविवारी रोटरीचा पुरस्कार प्रदान सोहळा

**जालना । प्रतिनिधी -** रोटरी प्रांत ३१३२ च्यावतीने रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता मंठा रोडवरील हर्षवर्धन पॅलेसमध्ये विजयोत्सव पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी



प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील प्रख्यात व्याख्याते व माजी प्रांतपाल मोहन पलेशा हे उपस्थित राहणार आहे. त्यांच्या उपस्थितीत प्रांतातील ११ जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य करणारे क्लबचे पदाधिकारी यांच्यासह सर्वोत्कृष्ट सहाय्यक प्रांतपाल, सर्वोत्कृष्ट डिस्ट्रिक्ट डायरेक्टर, सर्वोत्कृष्ट क्लबचा गौरव करण्यात येणार आहे. यावेळी रोटरी परिवारातील सदस्यांनी मोठ्या संख्येने पान २ वर

## छत्रपती संभाजीनगर-जालना-परभणी रेल्वेमार्ग अखेर दुहेरी ट्रॅकवर !

### माजी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रयत्नांना यश

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाड्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या छत्रपती संभाजीनगर-परभणी या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणासाठी अखेर केंद्र सरकारने हिरवा कंदील दाखवला आहे. दक्षिण मध्य रेल्वे विभागांतर्गत येणाऱ्या या सुमारे १७७.२९ किलोमीटर लांबीच्या मार्गासाठी केंद्राने तब्बल २,१७९ कोटी (अक्षरी-रूपये दोन हजार एकशे एक्याऐंशी कोटी) रुपये इतका निधी मंजूर केला आहे. हा प्रकल्प अनेक वर्षांपासून प्रलंबित होता, मात्र माजी रेल्वे राज्यमंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे अखेर केंद्र सरकारने हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

या दुहेरीकरणामुळे छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, आणि नांदेड या जिल्ह्यांना मोठा फायदा होणार आहे. यामुळे केवळ प्रवासी रेल्वेच नव्हे तर मालगाड्यांची वाहतूक सुद्धा अधिक वेगाने आणि अचूक वेळापत्रकानुसार होईल. हा संपूर्ण मार्ग वर्ष २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.



या प्रकल्पामुळे अनेक फायदे होणार आहेत. मालगाड्यांसाठी स्वतंत्र ट्रॅक असल्याने शेतमाल आणि औद्योगिक माल वाहतुकीत मोठी क्रांती घडेल. नागपूर-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरसारख्या मोठ्या औद्योगिक संकल्पनांना या मार्गाचा मोठा फायदा होईल. शिवाय, लॉजिस्टिक्स पार्क, कोल्ड स्टोअरेज, गोदामे, आणि नवीन उद्योगांना चालना मिळणार आहे.

या संपूर्ण प्रकल्पामध्ये माजी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचा मोलाचा वाटा आहे. रेल्वे राज्यमंत्री असताना त्यांनी या प्रकल्पासाठी सातत्याने दिल्लीमध्ये रेल्वे मंडळ आणि मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केला. विविध बैठकींमध्ये त्यांनी हा मुद्दा लावून धरला आणि मंत्रालयाचे लक्ष या गरजेच्या दिशेने वेधले. त्याचं फलित म्हणजे आज केंद्र सरकारने मोठ्या निधीसह या प्रकल्पास मान्यता दिली आहे.

हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्यानंतर केवळ रेल्वे प्रवासच सुकर होणार नाही, तर पान २ वर

## अण्णाभाऊ साठे यांनी लढण्याची प्रेरणा दिली - आ. अर्जुनराव खोतकर

### उत्सव समिती तर्फे लोकोपयोगी उपक्रमांनी जयंती साजरी



**जालना । प्रतिनिधी -** साहित्यरत्न, लोकशाहीर, अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती शुक्रवारी ( ता. ०१) जालना शहरासह जिल्हाभरात उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. जालना जिल्हा सर्व पक्षीय जयंती उत्सव समितीच्या वतीने डि. जे.मुक्त जयंती साजरी करत जुना जालना भागातील उड्डाणपुलाखाली असलेल्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर अभिवादन सोहळा, गुणवंत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी शिष्यवृत्ती, शालेय विद्यार्थ्यांना साहित्य , महिलांना साडी, धान्यवाटप आणि रक्तदान शिबीर असे लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. गायक अजय क्षीरसागर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य आणि कार्यावर आधारित बहारदार गीतांचे सादरीकरण करून जयंती उत्सवात रंगत भरली.

अभिवादन सोहळ्यास स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर, उद्योजक घनश्याम दास गोयल, युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नेपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. पाटील, समितीचे अध्यक्ष रवी पांडव, सचिव विनोद आठवे, पान २ वर

# नव्या शैक्षणिक धोरणात मातृभाषेतून रोजगाराच्या अनेक संधी - डॉ.सर्जेराव जिगे

## विषय निवड व मराठी भाषेतील रोजगार संधी विषयावरील आभासी कार्यशाळेत व्यक्त केले मत

**जालना । प्रतिनिधी -** बदलत्या काळाची गरज ओळखून स्वीकारण्यात आलेले नवे शैक्षणिक धोरण शिक्षण व्यवस्थेची पारंपरिक चौकट भेदून नवा दृष्टिकोन निर्माण करणारे आहे. विद्यार्थ्यांला एका विशिष्ट चौकटीत बंदिस्त न करता, त्याच्या आवडीनुसार कौशल्याधारित शिक्षणाची तरतुद या धोरणात करण्यात आली आहे. मराठी भाषेच्या संदर्भात मातृभाषेतून रोजगाराच्या अनेक नव्या संधी निर्माण करणारा अभ्यासक्रम मराठी अभ्यास मंडळाने तयार केला आहे. पहिल्या वर्षाची यशस्वीरित्या अंमलबजावणी झाल्यानंतर दुसऱ्या वर्षात हा अभ्यासक्रम राबविला जात असल्याची माहिती डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.सर्जेराव जिगे यांनी दिली. जे.ई.एस. महाविद्यालय, जालना व श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी सकाळी ११ वाजता ' द्वितीय वर्ष विषय निवड व मराठी भाषेतील रोजगार संधी' या विषयावर आयोजित विद्यापीठस्तरीय आभासी कार्यशाळेत उद्घाटक म्हणून ते बोलत होते. जे.ई.एस.महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ.यशवंत सोनुने कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते.यावेळी मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ.राजकुमार एल्लावाड प्रमुख मार्गदर्शक म्हणून तर प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.जितेंद्र अहिरराव यांची प्रमुख उपस्थिती होती.डॉ.वासुदेव उगले कार्यशाळा संयोजक म्हणून उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ. जिगे म्हणाले, ज्ञान,मूल्य आणि कौशल्य ही नव्या शैक्षणिक धोरणाची त्रिसूत्री आहे. या त्रिसूत्रीच्या माध्यमातून विद्यार्थ्याचा व्यक्तिमत्त्व विकास साधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांची आवड, निवड आणि सवड विचारात घेऊन अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. मराठी भाषेच्या अभ्यासातून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. मराठी भाषा खऱ्या अर्थाने रोजगार उपलब्ध करून देणारी भाषा होण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण आणि त्याला सुसंगत तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम सहायक ठरणार असल्याचे डॉ.जिगे शेवटी म्हणाले.




कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात, द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी विषय निवडतांना कोणत्या बाबी लक्षात घ्याव्यात, मराठी भाषेत शिक्षण घेतल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या रोजगार संधी या बाबत अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. राजकुमार एल्लावाड यांनी माहिती दिली. मराठी विषयाचे सखोल ज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून मराठी भाषेतून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. समाज माध्यमांसाठी दर्जेदार मजकूर लेखनातून घरबसल्या रोजगार उपलब्ध होऊ शकतो. पटकथा लेखन, नाट्यपरीक्षण, अनुवाद, भाषांतर आदी क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी आज घडीला उपलब्ध असल्याची माहिती डॉ.एल्लावाड यांनी यावेळी दिली.

नवीन शैक्षणिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर अंमलबजाणीच्या पहिल्या टप्प्यावर अनेक अडचणीचा सामना करावा लागला, विद्यापीठ प्रशासन, अभ्यास मंडळ, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यातील समन्वयातून त्या अडचणी सोडवल्या गेल्या. द्वितीय वर्षात विषय निवड करतांना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण तज्ञांच्या माध्यमातून केले जावे, या हेतूने सदरील कार्यशाळा आयोजित करण्यात आल्याचे अध्यक्ष डॉ.यशवंत सोनुने यांनी सांगितले. प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री, प्रभारी प्राचार्य डॉ.जितेंद्र अहिरराव यांनी कार्यशाळेला शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.

कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका आणि उद्दिष्ट्ये संयोजक डॉ. वासुदेव उगले यांनी आपल्या प्रास्ताविकातून स्पष्ट केली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अनेक महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने आभासी पद्धतीने या कार्यशाळेत सहभागी झाले होते. कार्यशाळेचे सूत्रसंचालन सहा. प्रा. ए.बी.गारकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.बाबू श्रीरामे यांनी केले.

# संपादकीय

## तंत्रज्ञानाचा दुरुपयोग

सध्याचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज जीवनावश्यक गरज बनली आहे. आजच्या या इंटरनेट युगात सोशल मीडिया हा परवलीचा शब्द बनला आहे. सोशल मीडियाचा वापर करत नाही असा व्यक्ती आज शोधूनही सापडणार नाही. लहानांपूसून थोरांपर्यंत, गरिबांपासून श्रीमंतापर्यंत, सर्वसामान्यांपासून सिलेब्रेटिंपर्यंत सर्वचजण सोशल मीडियाचा वापर करतात मात्र आज हाच सोशल मीडिया सीलेब्रेटिंसाठी डोकेदुखी बनत आहे. सोशल मीडियाचा वापर करून विविध प्रकारच्या अफवा पसरवल्या जातात हे तर आपल्याला माहीतच आहे. कधी सिलेब्रेटिंच्या निधनाच्या अफवा पसरवल्या जातात तर कधी सिलेब्रेटिंचे फोटो मोर्फ करून त्यांची बदनामी केली जाते तर कधी विविध प्रकारचे मिम्स बनवून त्यांची टर उडवली जाते. आता तर एआयच्या मदतीने सिलेब्रेटिंचे थेट डीपफेक व्हिडिओ बनवून त्यांना बदनाम केले जात आहे. मागील वर्षी बॉलिवूडची नवोदित पण लोकप्रिय अभिनेत्री असलेली रश्मीका मंधना हीचा असाच एक डीपफेक व्हिडिओ प्रसार माध्यमात व्हायरल करण्यात आला होता. सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर कला क्षेत्रात चांगलीच खळबळ माजली होती. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर स्वतः अभिनेत्री रश्मीका हिने हा व्हिडिओ तिचा नसल्याचे सांगून व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून तिला मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे सांगितले. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर बिग बी अमिताभ बच्चन यांनीही संताप व्यक्त केला होता. केवळ याच अभिनेत्रीचे नाही तर हिच्यासारख्या अनेक अभिनेत्रीचे असे मॉर्फ केलेले व्हिडिओ सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत. केवळ बॉलिवूडच्या अभिनेत्रींचेच नाही तर भारतीय क्रिकेट संघातील महत्वाच्या आणि मोठ्या खेळाडूंचेही अभिनेत्रींसोबतचे मॉर्फ व्हिडिओ सोशल मिडियावर फिरत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेले हे व्हिडिओ एडिटिंग केलेले असतात. मूळ चेहरा लपवून त्याजागी सिलेब्रिटींचा चेहरा लावण्यात येतो. हे व्हिडिओ एडिटिंग करताना एआय या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. डीपफेक हा शब्द डीप लर्निंगमधून घेण्यात आला असून तो एक शिकण्याच्याच प्रकार आहे. या शब्दात डीप हा शब्द असल्याने या शब्दाला अनेक पदर आहेत. डीप लर्निंग हे कृत्रिम न्युरल नेटवर्कवर आधारित आहे. या अल्गोरिदममध्ये बनावट साहित्य आणि भरपूर डेटा प्रविष्ट करून त्याचे एका विशिष्ट सामुग्रिमध्ये रुपांतरीत केली जाते. जी माणसे तंत्रज्ञानाचा चुकीचा वापर करतात अशी माणसं बदला घेण्यासाठी डीप फेकचा वापर करतात. एआयच्या मदतीने व्हिडिओ आणि फोटो एडिट करून लोकांना त्रास दिला जातो. इथे मात्र बदला घेण्यासाठी नाही तर बदनामी करण्यासाठी याचा वापर केला गेला. तंत्रज्ञानाने मानवी जीवनात क्रांती केली आहे. विज्ञानाच्या मदतीने दररोज नवे तंत्रज्ञान उदयास येत आहे. या तंत्रज्ञानाचा वापर मानवी कल्याणासाठी केला पाहिजे. विज्ञान तंत्रज्ञानाचा हेतू मानवी कल्याण हेच आहे मात्र काही नतद्रष्ट लोक या तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी नाही तर समाज विघातक कार्यासाठी करतात हा प्रकार त्यातलाच आहे. वास्तविक कोणाचाही असा फेक व्हिडिओ बनवून बदनामी करणे हा गुन्हा आहे. अशा समाज विघातक लोकांना कायद्याने कडक शिक्षा व्हायलाच हवी. तंत्रज्ञानाचा दुरुपयोग ही नवीच समस्या आता निर्माण झाली आहे. तंत्रज्ञानाचा असा दुरुपयोग करून कोणाचीही सहज बदनामी करता येत असल्यानेच अमिताभ बच्चन यांनी सोशल मीडिया वापरावा की नाही असा प्रश्न विचारला आहे. केवळ सिलेब्रेटिंच्या जीवनातच नव्हे सर्वसामान्यांच्या जीवनातही अशाप्रकारे तंत्रज्ञानाचा वापर कोणी केला तर त्यांचे आयुष्यच उध्वस्त होते म्हणूनच अशाप्रकारे तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करणाऱ्या नतद्रष्टांना शिक्षा झालीच पाहिजे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** तालुक्यातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय डुकरी पिंपरी,ता.जि.जालना या शाळेत साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी निमीत्त अभिवादन केले. या कार्यक्रमाला व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक सी.जी. वाघमारे, श्रीमती.एस.आर. कुलकर्णी., डी.एन.सोनकांबळे, पी.पी.नागरे., श्रीमती.ए.बी. देशपांडे, एल.बी.जाधव., आर. एस.ठाकरे., एस.बी.राऊत., श्रीमती.एम.ए.खरात. आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात महामानवांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस कु.ज्योती शेळके हिने पोवाडा सादर केला. त्यानंतर कु



अंजाना काटकर इत्यादी विद्यार्थिनींनी साहित्यरत्न शाहीर अण्णा भाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवन कार्यावर आपले विचार व्यक्त केले. तसेच शाळेचे सहशिक्षिका श्रीमती.देशपांडे.ए.बी.यांनी दोन्ही महापुरूषा बदल सुंदर असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.व नतंर शाळेचे मुख्याध्यापक सी.जी.वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व ते बोलताना म्हणाले की

आपल्या साहित्यातून सामान्य माणसांच्या दुःखाला वाचा फोडणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती महापुरुषानी सामाजिक कार्यात केलेल्या कार्याला उजाळा दिला.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जयंती व लोकमान्य टिळक यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. अण्णाभाऊ व लोकमान्य टिळक यांचा आदर्श सर्वानी समोर ठेवण्याचे आवाहन यावेळी मुख्याध्यापक सी.जी. वाघमारे यांच्यावतीने करण्यात आले. जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सुत्रसंचालन सांस्कृतीक विभाग प्रमुख श्रीमती.एस.आर. कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेचे सहशिक्षक डी. एन.सोनकांबळे केले.

# विचारांची प्रेरणा जिवंत ठेवण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** क्रांतीचे शिल्पकार, शोषितांच्या वेदनांना आपल्या लेखणीतून आवाज देणारे महान लोककवी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज विनम्र अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदराने अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष मा. राजेंद्र राख होते. त्यांनी आपल्या भाषणात अण्णाभाऊ साठे यांचे महत्त्व विशद करताना सांगितले, अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर ते समाज परिवर्तनाचे महान शिल्पकार होते. त्यांनी आपल्या लेखणीतून व जनगीतांतून अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. आजच्या काळात त्यांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. यावेळी कल्याण दळे यांनीही अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचा उल्लेख करत म्हटले, वंचित, कष्टकरी, बहुजन समाजाच्या आशा-आकांक्षा अण्णाभाऊंनी आपल्या लेखनातून मांडल्या. आजही त्यांच्या कथा, कविता आणि गीते सामान्य माणसाच्या जीवनाला मार्गदर्शक ठरतात. या अभिवादन कार्यक्रमास विजय चौधरी, जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा नंदा पवार, इब्राहिम शेख, अतिक खान, शहर जिल्हा सरचिटणीस गणेश चांदोडे, विनोद यादव, सुरज यलगंठवार, लतिफा शेख, सविता गायकवाड, मथुराबाई सोळूके, राहुल रत्नपारखे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# जालना जिल्ह्याच्या नवनियुक्त जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांचे जालना नगरीत हार्दिक स्वागत



**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदावर श्रीमती आशिमा मित्तल यांची नियुक्ती करण्यात आली असून आज त्यांनी अधिकृतरित्या पदभार स्वीकारला. त्यांच्या आगमनानिमित्त जालना नगरीत त्यांचे स्वागत करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) जालना शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, बर्याच वर्षांनंतर जालना जिल्ह्याला महिला जिल्हाधिकारी लाभल्या आहेत, ही जालनावासियांसाठी अभिमानाची बाब आहे. श्रीमती आशिमा मित्तल या कुशल प्रशासन, लोकसंपर्क आणि विकासात्मक दृष्टिकोनासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

पान १ व ४ वरुन

## मराठा आरक्षणासह ...

प्रवेश, राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती, अण्णासाहेब पाटील महामंडळ कर्ज, जात प्रमाणपत्र पडताळणी, नॉन-क्रिमीलेअर दाखले यांसारख्या अनेक बाबींमध्ये मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आणि पालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या सर्व गोष्टींमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी आणि निर्णयक्षम मंत्रिमंडळ उपसमिती त्वरित नेमण्यात यावी, अशी ठाम मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

## जालन्यात रविवारी ...

उपस्थित रहावे, असे आवाहन माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी केले आहे.

जालना रोटरीच्या इतिहासात जालन्याला प्रथमच डॉ. सुरेश साबू यांच्या रूपाने प्रांतपालपद मिळाले आणि ११जिल्ह्याचा कार्यविस्तार असलेल्या प्रांतात त्यांच्या संकल्पनेतून १०२ रोटरी क्लबमार्फत अनेक नाविन्यपूर्ण सेवाप्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यात आले. अब की बार एक लाख पार या मधुमेह निदान चाचणी अभियानाने अवघ्या सात महिन्यातच उद्दिष्टपूर्ती केली. यासह अन्य सेवा प्रकल्पांसाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या रोटरी परिवारातील सदस्यांच्या कार्याचा गौरव व्हावा म्हणून त्यांच्या संकल्पनेतून प्रथमच आयोजित या कार्यक्रमात प्रारंभी रोटरीच्या वर्षभरातील उल्लेखनीय कार्याचा आढावा घेऊन उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. समाजोपयोगी उपक्रम, प्रभावी नेतृत्व, संघटन कौशल्य यासाठी कार्य करणाऱ्या मान्यवरांना गौरवण्यात येणार आहे. सर्वोत्कृष्ट क्लब अध्यक्ष, सर्वोत्कृष्ट क्लब, सर्वोत्कृष्ट सहायक प्रांतपाल, सर्वोत्कृष्ट डिस्ट्रिक्ट डायरेक्टर यासह इतर अनेक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. रोटरीच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांनाही सन्मानित करण्यात येणार आहे.

रोटरीचे सामाजिक योगदान आणि एकत्रित यशाचे हे मोठे पर्व आहे. जालन्यात प्रथमच अशा स्वरूपाचा भव्य सोहळा होत असून, सर्व रोटरी सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. सुरेश साबू यांनी केले आहे.

## छत्रपती संभाजीनगर ...

मराठवाड्यातील संपूर्ण आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाला नवी दिशा मिळणार आहे. ही घडामोड म्हणजे रावसाहेब दानवे यांच्या दूरदृष्टीचा आणि लोकहिताच्या बांधिलकीचा ठोस परिणाम आहे.

यामुळे माजी रेल्वे राज्यमंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. सामान्य नागरिकांपासून ते स्थानिक जनप्रतिनिधींपर्यंत अनेकांनी त्यांच्या दूरदृष्टी, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि परिणामकारक निर्णयक्षमतेचे कौतुक केले आहे. मराठवाड्याच्या प्रगतीस चालना देणारा नेता म्हणून त्यांची प्रतिमा अधिक बळकट झाली आहे. त्यांच्याकडे विकासाभिमुख, लोकहितवादी नेतृत्व म्हणून पाहिले जात आहे.

## अण्णाभाऊ साठे ...

कार्याध्यक्ष सचिन लोंढे, कोषाध्यक्ष बालाजी पांडव, उपाध्यक्ष विक्की गवळी, अमोल पांडव,कैलास आठवे, मांगीलाल पाचीपांडव, सहसचिव रविराज पाखरे, मनोज गुढेकरसह कोषाध्यक्ष महेश जाधव, ज्येष्ठ नेते ॲड. शिवाजीराव आदमाने, अशोक साबळे, कृष्णा पांडव, विष्णू गवळी, पंडितराव भुतेकर, भाऊसाहेब घुगे, विष्णू पाचफुले, पांडुरंग डोंगरे, अनुराग कपूर, विजय जाधव, मेघराज चौधरी, सुनील साळवे ,संजूबाबा गायकवाड, अरविंद देशमुख, सुनील रत्नपारखे, सरपंच रवींद्र ढगे, अंकुश राजगिरे, किरण शिरसाठ, शिवराज जाधव, सी.के.डोईफोडे, सचिन कांबळे, पिटर खंदारे, राजेंद्र जाधव, संजय इंचे, हरीश रत्नपारखे, किशोर कांबळे, योगेश रत्नपारखे, दीपक हिवाळे, संदीप खरात, करूणा नामवाड, ॲड. कल्पना त्रिभुवन, ॲड. रेखा कांबळे, द्वारका लोंढे, संदीप साबळे, संतोष परळकर, ॲड. अशफाक पठाण, आदींची उपस्थिती होती.

आ. अर्जुनराव खोतकर याप्रसंगी बोलतांना म्हणाले, दीन, दलितांवर होत असलेला सामाजिक अन्याय, त्यांना मिळत असलेली हीन दर्जा ची वागणूक, अशा प्रतिकूल परिस्थितीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी अनिष्ट प्रथांना मूठमाती देऊन कथा, कादंबऱ्या ,साहित्य, लोकनाट्य, शाहीरी , लोकगीते यामाध्यमातून संयुक्त महाराष्ट्र लढाईत योगदान देत लढण्यासाठी प्रेरणा दिली. असे सांगून उत्सव समितीने डीजे धांगडधिंगा न करता विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करून गरजवंतांना आधार दिला. या उपक्रमांचे आ. खोतकर यांनी कौतुक केले. आपण मातंग समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला असून आगामी महापालिका निवडणुकीत सुद्धा लोकप्रतिनिधित्व देणार असल्याची घोषणा आ. खोतकर यांनी करताच टाळ्यांचा कडकडाट झाला. जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल,जेष्ठ नेते अशोक साबळे,संजूबाबा गायकवाड, करूणा नामवाड ,यांची यावेळी समायोचित भाषणे झाली. प्रास्ताविक कृष्णा पांडव यांनी केले सुत्रसंचालन आशीष रसाळ यांनी तर समितीचे अध्यक्ष रवी पांडव यांनी आभार मानले. यावेळी समितीचे सदस्य सचिन कांबळे , विशाल पांडव ,कुलदीप जगधने ,श्याम सराटे, रवी रंधवे, राम हिवाळे, नितीन हिवाळे, शांतीलाल लोंढे, यांच्यासह महिला, तरुण नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान माजी मंत्री राजेश टोपे, शिवसेना उबाठाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर ,राजेंद्र राख, मुरलीधर थेटे, हरिहर शिंदे, माजी नगरसेवक सतीश जाधव, महेश निक्कम, सुहास मुंढे, निरंत पट्टेबहादुर, आदींनी सोहळ्यास भेटी देऊन शुभेच्छा दिल्या.

**लेखणीचा दणका दिला शाहीरान....!**


आंबुजी पावर आंबुजी तोडा फेम गायक अजय क्षीरसागर यांनी रशिया केली दिवाणी,, माझ्या अण्णाभाऊंनी...! लेखणीचा दणका दिला शाहीरान,,जाळ अन् धूर संगच काढला..., अशा एकापेक्षा एक बहारदार गीतांचे सादरीकरण करून जमलेल्या हजारो बांधवांना मंत्रमुग्ध केले. यावेळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा विजय असो..,क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचा विजय असो.., अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला

## जालन्याच्या नूतन ...

राज्याच्या एकात्मिक बालविकास सेवा योजना मा. आयुक्तांकडून अभिनंदन करण्यात आले असून, नाशिक जिल्ह्याचा आदर्श घेऊन राज्यातील इतर जिल्ह्यांमध्येही अंगणवाडी केंद्रांना वीज जोडणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. श्रीमती आशिमा मित्तल यांचा प्रदीर्घ अनुभव आणि दूरदृष्टी जालन्याच्या विकासासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जालना जिल्ह्यात सकारात्मक बदल घडून येतील अशी अपेक्षा आहे.









**जालना येथे विविध पक्ष संघटना तर्फे साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन करण्यात आले.**

**(छाया - जावेद तंबोली)**

# रायगड पोलिसांनी सायबर गुन्हेगारी टोळीचा केला पर्दाफाश: ११ आरोपींना अटक



**रायगड । प्रतिनिधी -** पोलिसांनी एका मोठ्या सायबर गुन्हेगारी टोळीचा पर्दाफाश करत, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून फसवणूक करणाऱ्या ११ शातिर आरोपींना मुद्देम ालासह अटक केली आहे. २३ मे २०२५ रोजी दाखल झालेल्या एका तक्रारीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

**गुन्हेगारीची पद्धत आणि जप्त केलेला मुद्देमाल**

हे आरोपी विविध बनावट कंपन्यांच्या नावाखाली नागरिकांना लुबाडत होते. कर्ज, ऑनलाइन नोकऱ्या, इन्व्हेस्टमेंट, स्कॉलरशिप अशा अनेक आमिषांनी त्यांनी लाखो रुपये उकळले. या कारवाईत पोलिसांनी ६,१७५ सिमकार्ड्स, ३५ मोबाईल फोन, लॅपटॉप, स्टॅम्प, रोख रक्कम (६.६ लाख रुपये) आणि अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त केली आहेत. यामध्ये ४ रबर स्टॅम्प, १ अमेझॉन कंपनीचा टॅब, १ डेल कंपनीचा लॅपटॉप, १ सोनी कंपनीचा डीपीएन स्वीच पोर्ट, १ पीओई स्विच, १ बँक पासबुक, आणि कॅनरा बँकेचे एटीएम कार्ड यांचा समावेश आहे.

**अटक आरोपी**

अटक करण्यात आलेल्या ११ आरोपींमध्ये अब्दुस सत्यम बारभुपान, बिलाल फैजान अहमद, नदीम महमद अस्लम अहमद, लारैब म ोहम्मद रफीक खान, शादान येतात अहमद खान, मोहम्मद फैसल सैराउद्दीन खान, बलम ोरी विनयकुमार राय, गंगाधर गंगाराम मूहून, अमन संतराम प्रकाश मिश्रा, मोहसिन मियां खान आणि शम्स ताहीर खान यांचा समावेश आहे. या टोळीचा मुख्य आरोपी आदित्य उर्फ अभय मिश्रा हा उत्तर प्रदेशातील असून, तो ऑनलाइन स्कॉलरशिप आणि नोकरीच्या आमिषाने केवळ भारतातीलच नव्हे, तर नेपाळ, बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका यांसारख्या इतर देशांतील नागरिकांचीही फसवणूक करत होता.

**दाखल गुन्हा आणि तपास पथक**

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३१६ (२), ३ (५) २३८, ३४० (२) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (डी) ६६ (सी), अंतर्गत (एफ.आय.आर. क्र. ०७ / २०२५) गुन्हा नोंदवण्यात आला आहे. रायगडच्या पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल, भापोसे, आणि अपर पोलीस अधीक्षक, श्री. अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली मपोनि श्रीमती रिजवाना नदाफ, सपोनि श्री. अमोल जाधव, सहा. फौ. अजय मोहिते, पोलीस हवालदार राजीव झिंजुर्ट, पोलीस नाईक तुषार पाटील, पोलीस नाईक राहुल पाटील, पोलीस शिपाई श्रेयश गुरव, महिला पोलीस हवालदार सुचिता पाटील आणि महिला पोलीस शिपाई पूजा पाटील यांचे पथक या गुन्ह्याचा तपास करत आहे.

**पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांचा नागरिकांना सतर्कतेचा इशारा**

पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही अपरिचित व्यक्तीकडून आलेल्या कॉल/संदेश/ई-मेलवर विश्वास ठेवू नये असे त्यांनी सांगितले आहे. सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ सायबर हेल्पलाईन १९३०, १९४५ किंवा १४४०७ या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.



**श्रीमती आशिमा मित्तल यांनी आज, शुक्रवार, दिनांक १ ऑगस्ट रोजी जालन्याच्या नूतन जिल्हाधिकारी म्हणून आपल्या पदाची सूत्रे हाती घेतली. पदभार स्वीकारल्यानंतर विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आणि अधिकाऱ्यांनी त्यांचे जालना जिल्ह्यात हार्दिक स्वागत केले. यावेळी चंद्रकांत रत्नपारखे, अब्दुल रफिक, दिग्विजय दांडगे, रिजवान शेख आदींनी स्वागत केले.**

# चला दोस्तहो मैत्रीवरती बोलू काही

ज्यांच्या जवळ मनातील भाव व्यक्त करतांना लज्जा संकोच वाटत नाही, खोटे बोलावेसे वाटत नाही, फसवावेसे वाटत नाही पाप-पुण्याची कबुली देण्यास मनकचरत नाही, ज्याला आपला पराक्रम कौतुकाने सांगावासं वाटतो, ज्याच्याजवळ पराभवाचे शल्य उघडे करायला कमीपणा वाटत नाही, ज्याच्या सुखदुःखाशी आपण एकरूप होऊ शकतो तो खरा मित्र आणि ती खरी मैत्री.

बंधना पलीकडले हे एक नाते असते. शब्दाचे त्याला बंधन नसते. दुःखाला तिथे थारा नसतो आणि गोडवा मैत्रीत असतो.

जागतिक स्तरावर तीस जुलै रोजी मैत्री दिवस म्हणजेच फ्रेंडशिप डे साजरा केला जातो, परंतु भारतात ऑगस्टमध्ये येणाऱ्या पहिल्या रविवारी मैत्री दिवस साजरा केला जातो.

फ्रेंडशिप डे अर्थातच मैत्री दिवस. हा संपूर्ण जगात उत्साहात साजरा केला जातो, कारण असा एखादाच कोणी माणूस असेल ज्याला मित्र नाही, आणि ज्याला मैत्रीचे महत्त्व ही माहीत नाही. आपल्या सर्वांच्या आयुष्यात कमी किंवा अधिक प्रमाणात मित्र असतात, मित्रांसमवेत घालवलेला वेळ कोणास आवडणार नाही. विशेषतः बालपणातील मैत्री खूप घट्ट असते. ज्याची आठवण कायमची मनात राहते. मैत्रीच्या नात्यात जात धर्म वगैरेला महत्त्व नसते आणि त्याचा अडथळा नसतो त्या नात्याला एक खास महत्त्व आहे.

मैत्री एक असं नातं आहे ज्याला एखादी व्यक्ती स्वतःच्या इच्छेनुसार निवडतो. बालपणात नकळत बरेच मित्र बनून जातात. ज्यामध्ये काही मित्र असेही असतात जे शाळेपासून ते कॉलेजपर्यंत साथ देतात तर काही चांगल्या आणि वाईट काळात देखील आपली मैत्री निभावतात. तथापि असे मित्र फारच कमी असतात जे आयुष्यभर आपली मैत्री जपतात. म्हणून मैत्री करताना आपण सावध असायला हवे.

आपण सहजच म्हणत असतो -समान गुणे व्यसनेशुच् सख्यम्

मित्र असे असतात ज्यांचा सहवास आपल्या वर्तमान आणि भविष्यावर प्रभाव टाकत असतात . वाईट सवय असलेल्या मित्रांचा सहवास आपल्याला आणि आपल्या भविष्याला खराब करतात, तर चांगली विचारसरणी आणि चांगल्या सवयी असलेले मित्र आपल्या व्यक्तिमत्त्वाला आणि आपल्या जीवनाला सुशोभित करण्यास मदत करतात.

आजकाल मित्रांना अनेक वर्गात विभागले आहेत जसं की एक सारखा छंद जोपासणारे मित्र, व्यवसायी मित्र, कामाच्या ठिकाणचे मित्र,सोशल मीडियावर होणारे मित्र, फेसबुक, ईंस्टाग्रामवरले मित्र, इत्यादी पण जे खरे मित्र असतात त्यांची आवड निवड एक सारखी असते. ते आपल्याला आयुष्याचा पदोपदी साथ देतात ते नेहमीच आपल्या चांगल्याचा विचार करतात. सोशल मीडियावरील मित्र करताना योग्य ती खबरदारी घेणे सध्या आवश्यक बाब झाली आहे. कारण अनेक वेळा फेसबुक वरील मित्राचा चेहराच दिसत नसतो आणि बऱ्याच वेळा असलेला चेहराही वेगळाच असतो. त्यामुळे फसवणूक होण्याची आणि फसवण्याची शक्यताही असते. राजकीय क्षेत्रातही मित्र म्हणून उल्लेख केला जातो पण राजकारणात कोणीच कोणाचा मित्रही नाही तर शत्रूही नाही. कारण शत्रू असणारा मित्र होतो आणि मैत्री असणारा शत्रू होतो असे काहीतरी आहे त्यामुळे त्यांच्या बाबतीत मैत्री दिवस लागू होणार नाही असे वाटते.

आपल्या आयुष्यात देखील कोणी खरामित्र असेल तर त्याला मैत्री दिनाच्या या खास प्रसंगी आपल्या त्या खास मित्राला तो खास असल्याची जाणीव नक्कीच करून देत असतो. हा दिवस आपल्या जिवलग मित्रांसह साजरा केले जातो. बरेच लोकं हा दिवसआपल्या मित्रांसह साजरा करण्यासाठी विविध योजना आखून हा दिवस साजरा करतात. संपूर्ण दिवस जरी नाही तरी जेवढे शक्य असल्यास आपल्या व्यस्ततेमधून काही क्षण आपल्या मित्रांसाठी नक्की काढतो,वा काढावे.

या दिवशी मैत्रीचे निरनिराळ्या प्रकारचे आकर्षक धागे, शुभेच्छापत्र, आता काही वर्षांपासून वॉट्साप वर



शुभेच्छा संदेश, फेसबुकवर संदेश दिले जातात.

एकत्रित भोजनाचे बेत आखले जातात. एकमेकां पासून दुर असतील तर फोन वरुन बोलून जवळीक साधली जाते.

भारतात मैत्री दिवस ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी साजरा करतात.

अमेरिकेत सरकारने एका माणसाला ठार मारले. त्याचा एक मित्र होता,त्याला मित्राचे मरणाचे दुःख झाल्याने जीवन संपवले.त्याच्या स्मरणार्थ हा दिवस १९३५ पासून मित्रता दिवस फ्रेन्डशिप डे साजरा होऊ लागला.

मैत्री कशी असते ह्या विषयीच्या दोन गोष्टी बघा, घट्ट मैत्री कशी असते....

जेव्हा छ.शिवाजी महाराजांनी किल्ले हाती घेण्याची मोहीम चालवली तेव्हा प्रत्येकवेळी तानाजी आघाडीवर होते. शिवाजी महाराजांच्या सैन्यात अनेक शूरवीर असतानाही जेव्हा कोंडाणा जिंकून आणण्याची वेळ आली तर म हाराजांच्या मनात एकच नाव होते ते म्हणजे तानाजी मालुसरे.

इतिहासातील हे युद्ध सिंहगडची लढाई म्हणून नोंदवले गेले आहे. तेव्हा ते कोंडाणा म्हणून ओखळले जात होते. शिवाजी महाराजांचे परममित्र तानाजी मालसुरे आपल्या मुलाच्या लग्नाच्या तयारीत व्यस्त असताना हे सर्व घडले होते. कोंडाणा किल्ल्यासह २३ किल्ले पुरंदर करारामध्ये मुघलांना सोपविल्यानंतरही मोगल सल्तनत तहान भागली नव्हती. औरंगजेबाने आपला विश्वासू उदयभानु राठोड यांना कोंडाणा किल्ल्याकडे पाठवून मराठा साम्राज्य नष्ट करण्याचा नेम धरला होता.तेव्हा शिवाजी महाराजांना आपल्या शूर व प्रिय मित्राला युद्धाच्या घटनेत सामील करायचे नव्हते, कारण तानाजीच्या घरी लग्नाची तयारी सुरु होती. पण स्वराज्य आणि छ. शिवाजी महाराजांवर संकट आल्याचे कळले तर तानाजींनी मुलगा रायबाच्या लग्नाची पर्वा न करता भगवा परिधान केला. अत्यंत कठीण प्रसंगी राज्यासाठी कामास येण्यापेक्षा मोठे भाग्य काय असावे असा विचाराने तानाजींची छाती गर्वाने फुलून गेली. आधी लग्न उरकून घेऊ, मग काम गिरीसाठी निघू असे शेलार मामांनी म्हटल्यावर तानाजींनी उत्तर दिले की आधी लगीन कोंढाण्याचे मग लगीन रायबाचे. तानाजी जिजाऊंना भेटून रायबाची जबाबदारी शिवाजी महाराजांच्या हाती देऊन म्हणाले की कोंढाण्याहून परतलो तर मी मुलाचे लग्न लावेन आणि जर मेलो तर तुम्ही त्याचे लग्न लावून द्या.

४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजी म ालुसरे यांच्या नेतृत्वाखाली राजगडावरुन मराठा सैन्य निघाले. आपले प्राण पणाला लावून कोंडाणा ताब्यात घेतला. महाराजांना विजयाची बातमी कळताच आनंद झाला पण तानाजींनी प्राण गम ावले कळताच त्यांचे अश्रु अनावर झाले आणि त्यांच्या तोंडून उद्गार निघाले- गड आला पण सिंह गेला...

मित्र म्हणजे असा धागा,<br>मोकळं व्हावं अशी जागा,<br>कोणतच नाटक नाही....

प्रत्येकाच्या आयुष्यात असे मित्र मैत्रिणी असतातच.. तर असाच एक मित्र म्हणा, मैत्रीण म्हणा आपल्या सर्वांच्याच आयुष्यात आहे! कोण बरं?? तर ते म्हणजे पुस्तक ! पुस्तकाशी मैत्री. ही पुस्तके लहानपणापासून तर शेवट पर्यंत बाल साहित्यापासून तर भगवद् गीतेपर्यंत साथ देणारी ही जिवाभावाचे मित्र- मैत्रीण! आपल्या एकटेपणात आपला साथ देणारी...अजून...

मैत्री हा शब्द आठवताच प्रथम डोळ्यांसमोर उभी राहते ती कृष्ण-सुदामा यांची मैत्री. महाभारताच्या काळातली ही मैत्री. पण भारताच्या इतिहासात ती अमर होऊन बसली. कृष्ण श्रीमंत होता; तर सुदामा गरीब होता. कृष्ण देखणा, बलवान; तर सुदामा हडकुळा, खंगलेला आणि रूपाने सामान्य. पण दोघांची घनदाट मैत्री झाली. सांदिपनी ऋषींच्या आश्रम ात गुरुगृही दोघेही शिक्षण घ्यावयास आले. त्या आश्रमात त्यांची इतकी मैत्री झाली की, एकमेकांशिवाय एकमेकांना चैन पडायचे नाही. कृष्ण मनानं इतका मोठा, इतका उदार की त्याने आपला मित्र एक दरिदी भिक्षुक ब्राह्माण आहे याचा कधी विचारही केला नाही.

आश्रमातले दिवस संपले. पुढे श्रीकृष्ण द्वारकेचा राजा झाला. सुदाम्याच्या कानी त्याची किर्ती साहजिकच पडली. त्याला कृष्णाला भेटावयाची, बघावयाची इच्छा झाली. तो द्वारकेला आला. राजवाड्याच्या दाराशी भीत भीत उभा राहिला. पहारेकरी ओरडले. त्याला आत जाऊ देईनात. कृष्णाने विचारले 'कोण आहे रे तिकडे?' सुदामा थरथर कापत म्हणाला, 'मी सुदामा...' सुदामा हे नाव कानी पडताच कृष्ण धावत आला आणि त्याने सुदाम्याला कडकडून मिठी मारली. प्रेमाने आत नेऊन आपल्या सिंहासनाशेजारी बसवले आणि विचारले, 'काय भेट आणलीस माझ्यासाठी?' सुदाम्याने लाजत लाजत अंगावरला पंचा पुढे केला. त्यात पोह्यांची पुरचुंडी होती. कृष्णाला आवडणारे पोहे सुदाम्याने आठवणीने त्याच्यासाठी आणले होते. कृष्णाने अधाश्यासारखे ते पोहे खाल्लेत. त्याच्या हृदयात गहिवर दाटून आला. डोळ्यात पाणी उभे राहिले. म्हणाला, 'सुदामा, किती रे तुझे माझ्यावर प्रेम. अरे, मला पोहे आवडतात हे लक्षात ठेवून तू प्रेम ाने मला पोह्यांची भेट दिलीस!'

कृष्ण-सुदाम्याच्या मैत्रीची ही कथा! पण तिचे नुसते स्मरण झाले तरी डोळ्यात पाणी येते. दोन व्यक्तीं मध्ये मैत्रीची भावना केवढी महान असू शकते हे ही कथा सिद्ध करते. खरोखर, मैत्री किती श्रेष्ठ आहे.

प्रत्येक माणसाला मित्र हा हवाच ! पुरुषाला मित्र आणि स्त्रीला मैत्रीण म्हणजे एक आधार असतो. सुप्रसिद्ध लेखिका विभावरी शिरुरकरांनी एके ठिकाणी असे लिहिले आहे की शंभर मैत्रिणींपेक्षा स्त्रीला एक पुरुष मित्र अधिक आवडतो ! तर.....

पु.ल.देशपांडे म्हणतात,<br>मैत्रीची सोपी व्याख्या आहे.<br>रोज आठवण यावी असं काही नाही<br>रोज भेट व्हावी असं काही नाही<br>एवढेच कशाला रोज बोलणं व्हावे असंही नाही<br>मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री<br>आणि तुला याची जाणीव असणं<br>ही झाली मैत्री...

ज्याच्याजवळ मनातील भाव व्यक्त करता येतात ते व्यक्त करताना संकोच वाटत नाही आणि त्यात खोटेपणा नसतो किंवा फसवा फसवी नसते ज्याच्याजवळ आपण आपली गुपित अतिशय मोकळेपणाने उघडे करतो आणि एकमेकांच्या सुखदुःखाची एकरूप होऊन जात असतो अशा भावनेलाच किंवा अवस्थेला मैत्री म्हणतात आणि जो ते निभवतो तोच खरा मित्र .अशी एक मैत्रीची व्याख्या आहे. खरा मित्र असतो तो नेहमीच योग्य अशा गोष्टी करण्याचा सल्ला देत असतो. एकम ेकांच्या प्रगतीची आणि समृद्धीसाठी एकमेकासाठी प्रयत्न असणे<br>तसेच आनंद असणे हीच मैत्री आहे.<br>असा मैत्रीचा धागा जपू या....<br>सर्वांना मैत्री दिवसाच्या शुभेच्छा !

**दिलीप देशपांडे.**<br>**जामनेर. जि.जळगांव**<br>**मोबा.८९९९५६६९१७**<br>dilipdeshpande24gmail.com

# जिल्ह्यातील ३४ रुग्णालये मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी संलग्नीत

## मागील तीन महिन्यात ५६ लाख ७५ हजार रुपयांची मदत

**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष पात्र व गरजू रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. वैद्यकीय मदत मिळण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाशी संलग्नित जालना जिल्ह्यातील ३४ रुग्णालयांचा समावेश आहे. तरी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातंर्गत १ मे ते ३० जून २०२५ पर्यंत जालना जिल्ह्यातील ७६ रुग्णांना ५६ लाख ७५ हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे अध्यक्ष तथा वैद्यकिय अधिकारी डॉ. सोपान विक्रम चव्हाण यांनी दिली.

राज्यातील नागरिकांना दुर्धर आजारावरील उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडून आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यातून मदत मिळविण्यासाठी नागरिक मंत्रालयात जात असत. परंतू नागरिकांना या सेवा सहजपणे त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सध्या जालना येथे हा मदत कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीमध्ये तळमजल्यावर कार्यरत आहे. या कक्षाचे प्रमुख वैद्यकिय अधिकारी डॉ. सोपान विक्रम चव्हाण हे आहेत.

जालना जिल्ह्यातील सामान्य रुग्णालय, जालना मिशन हॉस्पिटल, उपजिल्हा रुग्णालय अंबड, दीपक मेडिकल फाऊंडेशन ण्ड रिसर्च सेंटर, जालना हॉस्पिटल ण्ड क्रिटीकल केअर, दीपक हॉस्पिटल, वरकड हॉस्पिटल, जालना हॉस्पिटल, निरामय हॉस्पिटल, संजिवनी म ल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, विवेकानंद हॉस्पिटल, म ान्टे मुंडे हॉस्पिटल, संत गाडगेबाबा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, सह्याद्री हॉस्पिटल, सरस्वती तेलूराम गोयल हार्ट केअर, शिंदे बाल रुग्णालय, ओम बाल रुग्णालय, आस्था हॉस्पिटल ण्ड आयसीयु, ओम मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल ण्ड रिसर्च सेंटर, जोशी क्सिडेंट ण्ड जनरल हॉस्पिटल, वरद हॉस्पिटल ण्ड क्रिटीकेअर, मंत्री सर्जिकल ण्ड मॅटर्निटी हॉस्पिटल, आस्था हॉस्पिटल ण्ड मॅटर्निटी हॉस्पिटल, नवजीवन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल ण्ड रिसर्च सेंटर, आरव्ही मेडिकेअर हर्ट ण्ड सुपर स्पेशालिटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, कलावती सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, श्री राजुरेश्वर हॉस्पिटल, विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, आरंभ बाल रुग्णालय ण्ड हॉस्पिटल, शतायू म ल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, विरा मेडिसिटी हॉस्पिटल, दीपक हॉस्पिटल (कोड ६३७७) अशी एकुण ३४ रुग्णालये संलग्नीत करण्यात आलेली आहेत.

# जालन्याच्या नूतन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल: एक कर्तृत्ववान प्रशासकीय अधिकारी

**जालना । प्रतिनिधी** - श्रीमती आशिमा मित्तल यांनी जालन्याच्या जिल्हाधिकारीपदाचा पदभार शुक्रवार (दि १) रोजी स्वीकारला. यापूर्वी त्या नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होत्या, जिथे त्यांनी शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण आणि उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. मूळच्या राजस्थान राज्यातील जयपूर येथील रहिवासी असलेल्या जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी आयआयटी मुंबई येथून बी.टेक. सिव्हिल इंजिनियरींगचे शिक्षण घेतले आहे. या शिक्षणक्रमात त्यांना शंकर दयाल शर्मा सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. त्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रातही काम केले आहे. विशेष म्हणजे, त्यांचे मानववंशशास्त्र (पींर्हीश्रिसू) या विषयात पदव्युत्तर शिक्षण (मास्टर्स) देखील झालेले आहे, जे त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची साक्ष देते. श्रीमती मित्तल यांनी सन २०१७ ची भारतीय प्रशासकीय सेवा (खड) परीक्षा उत्तीर्ण केली असून, त्यांनी देशात १२ वा क्रमांक पटकावला होता. २०१८ साली त्या भारतीय प्रशासकीय सेवेत म हाराष्ट्र राज्यात रुजू झाल्या. प्रशासकीय सेवेत रुजू झाल्यापासून त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. यापूर्वी त्यांनी नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून आणि पालघर जिल्ह्यातील डहाणू येथे आयटीडीपी (खपींशसीरींशव ढीळलरश्र उर्श्रींशश्रेशिपीं झीेक्षशलीं) च्या प्रकल्प अधिकारी म्हणून यशस्वीपणे काम पाहिले आहे. तसेच, अहिल्यानगर येथे त्यांनी प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी म्हणूनही कामकाज पाहिले आहे. श्रीमती मित्तल यांनी शालेय जीवनातच आपली गुणवत्ता सिद्ध केली होती. त्यांनी राष्ट्रीय प्रतिभा शोध चाचणी (छढडए) आणि किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना (घधझध) यांसारख्या प्रतिष्ठित शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. प्रशासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी बहुराष्ट्रीय (चछउ) कंपनीम ध्येही काम केले आहे. सामाजिक सेवेची तीव्र भावना त्यांच्यात असून, अनेक स्वयंसेवी संस्थांमध्ये (छॠजी) त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. सामाजिक बदलांसाठी त्या नेहमीच आग्रही राहिल्या आहेत आणि याच विचारातून त्यांना भारतीय प्रशासकीय सेवेत येण्याची प्रेरणा मिळाली. नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करताना श्रीमती मित्तल यांनी अनेक अभिनव उपक्रम राबवले आणि जिल्ह्याच्या विकासात महत्त्वाचे योगदान दिले. त्यांच्या संकल्पनेतून 'सुपर ५०' हा उपक्रम राबवण्यात आला, ज्या अंतर्गत नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दिव्यांग आणि खुल्या प्रवर्गातील एकूण २०० विद्यार्थ्यांना जेईई/सीईटी व नीट (NEET) परीक्षांसाठी निवासी स्वरूपाचे प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमातून




२२ विद्यार्थ्यांनी जेईई मुख्य (JEE main) परीक्षा उत्तीर्ण केली, त्यापैकी ७ विद्यार्थ्यांनी जेईई ॲडव्हान्स परीक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांचे आयआयटीएन बनण्याचे स्वप्न पूर्णत्वास आले. राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियानात नाशिक जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला, ज्यामुळे त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्य सरकारच्या ग्राम विकास विभागाच्या वतीने श्रीमती आशिमा मित्तल यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले. महाराष्ट्र सरकारतर्फे भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक निमित्त गठीत समितीतर्फे आयोजित 'राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत' सर्वाधिक विद्यार्थी सहभागी झाल्याने नाशिक जिल्ह्याचा 'प्रथम' क्रमांक आला. याबद्दल श्रीमती आशिमा मित्तल यांचा महामहिम राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राजभवन, मुंबई येथे गौरव करण्यात आला. मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवस कार्यालयीन सुधारणा या उपक्रमात नाशिक जिल्हा परिषदेचा राज्यात तिसरा क्रमांक आला असून, ७ मे २०२५ रोजी मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते श्रीमती आशिमा मित्तल यांचा सत्कार करण्यात आला होता. तसेच, महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाकडून कुपोषण निर्मूलन व बालकांसाठी राबवलेल्या अभिनव उपक्रमांमुळे त्यांना सन २०२३ आणि सन २०२४ असे सलग २ वर्ष 'बालस्नेही पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले आहे. नाशिक जिल्ह्यातील ३०३० स्वम ालकीच्या अंगणवाडी केंद्रांना वीज जोडणीसाठी त्यांनी विशेष मोहीम हाती घेऊन सर्व अंगणवाडी केंद्रांना वीज जोडणी उपलब्ध करून दिली. त्यांच्या या कार्याचे **पान २ वर**




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.